महाराष्ट्र शासन

क्रमांक- एनटीसी-३५९३/५६९५/ विशि-२
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १५ फेब्रुवारी, १९९३.

प्रति,
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे.

विषय :- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून मुलींचे उर्दू माध्यम [ इंग्रजी माध्यम] अध्यापक महाविद्यालये उघडण्यास परवानगी.

महोदय,

सन १९९२-९३ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता विद्यापीठा-कडून शासनास प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करून महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी पुणे या संस्थेच्या १९९३-९४ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर पुणे विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३ [४] व[५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- |
| पुणे | अध्यापक महाविद्यालय मुलींचे उर्दू माध्यम [ इंग्रजी माध्यम ] |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवर आहे :-

१] सदर महाविद्यालयास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

२) शासन पत्र क्र. एनटीसी-२२८९/[१८८८]/विशि-२, दि. २२-६-१९९० मधील खाजगी अध्यापक महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

३] सदर महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ८० असेल व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यांस सदर महाविद्यालये रु ३,६००/- कमाल शिक्षण शुल्क आकारतील. विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्तींचे सदर अध्यापक महाविद्यालयाने पालन करण्यात यावे.

४] स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३ [६] व [७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ बी. रा. जोशी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] शिक्षण संचालक [ उच्च शिक्षण ], महाराष्ट्र राज्य, पुणे.

२] प्रशासनाधिकारी [ उच्च शिक्षण अनुदान] पुणे विभाग, पुणे

३] सचिव महाराष्ट्र कॉस्मापॉलिटेन एज्युकेशन सोसायटी, पुणे.

४] निवड नस्ती/ विशि-२

पौवळे- १६२९३